**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः जितेंद्र रंगराव चव्हाण

वयः ४३ वर्षे, व्यवसायः पोलीस हवा., ब.नं.८८९

ए. एन. टी. एफ., नवी मुंबई.

राहणार – पेण, ता. पेण, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. पवार यांच्यामार्फत :**

०१. सन २०२१ मध्ये मी नागोठणे पोलीस ठाण्यात नेमणुकीस होतो. वरिष्ठांच्या आदेशान्वये गु.र.क्र.३०/२०२१ चा तपास माझेकडे देण्यात आला. मी फिर्यादचे अवलोकन केले. दि.१०.०४.२०२१ रोजी मी दोन पंचासह घटनास्थळी जावून पंचनामा केला. घटनास्थळ कोंडगाव येथे आरोपी कृष्णा धामणे याच्या घरासमोर अंगणात होते. पंचनाम्यावेळी गुन्हयात वापरलेल्या दोन बांबूच्या व दोन लाकडी काठया तसेच एक दगड असा मुद्देमाल जप्त केला. त्या प्रमाणे मी सविस्तर पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेल्या **नि.क्र.६९** वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. जप्त केलेला मुद्देमाल पोलीस ठाण्यातील मुद्देमाल कारकून यांच्याकडे जमा करुन मुद्देमाल पावती तयार केली. आता मला दाखवलेली मुद्देमाल पावतीची कार्बन प्रत तीच

आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १०८** देण्यात येत आहे. पंचनाम्यावेळी काढलेल्या फोटोंची प्रिंट काढून ती दोषारोपपत्रासोबत जोडली. सदर फोटो आशिष पाटील याने काढला होता. त्याबाबत त्याच्याकडून भा. पु. का. कलम ६५ ब अन्वये प्रमाणपत्र घेतले व ते दोषारोपपत्रासोबत जोडले. साक्षीदारांचे टिपणे घेतले. जिल्हाधिकारी यांचे जमावबंदीचे आदेश त्यावेळी लागू असल्यामुळे त्या आदेशाची प्रत घेवून दोषारोपपत्रासोबत जोडली. आता मला दाखवलेली सदर आदेशाची प्रत तीच असून त्यास **नि.क्र.१०९** देण्यात येत आहे. फिर्यादी व जखमी साक्षीदारांचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले.

०२. मी जप्त केलेल्या चार काठया व दगड मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविलेल्या **वस्तु अ, ब, क** वरील तीन काठया तसेच **वस्तु ड** वरील दगड तोच आहे.

०३. माझे तपासात आरोपी यांनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी क्र. १ कृष्णा व क्र. ८ प्रभाकर न्यायकक्षात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र.१ ते ११ तर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत यांचे मार्फत**

०४. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणाचा तपास करताना मी घटनास्थळाच्या बाजुला असलेल्या लोकवस्तीतील स्वतंत्र साक्षीदाराचे जबाब नोंदवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने मुद्देमालाची लांबी रुंदी दिली

नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, साक्षीदाराने त्यावेळी सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देताना फिर्यादीने काठयांची लांबी रुंदी सांगितली नव्हती. जप्त केलेल्या काठया व दगडाचा ओळख पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०९ वरील आदेश फिर्यादीच्या गावात दवंडी पिटवून प्रसिध्द केला होता या अनुषंगाने ग्रामस्थांचा जबाब नोंदविला नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने फिर्याद देताना तो रक्तबंबाळ झाला होता असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सा.क्र.३ पंकज याने जवाब देताना सुशिल राजिवले याचे डोक्यातून रक्त येत होते असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने देखील फिर्यादी व साक्षीदारांविरुध्द त्याच दिवशी फिर्याद दाखल केली होती.

०६. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी जावून मुद्देमाल जागेवरुन जप्त केल्याचे तसेच त्याप्रमाणे **नि.क्र.६९** वरील पंचनामा तयार केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पो.शि. आशिष पाटील याने फोटो काढले होते व त्या फोटोंची प्रिंट काढून मी त्याच्याकडून भा.पु.का. कलम ६५ ब अन्वये प्रमाणपत्र घेतले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी जिल्हाधिकारी यांचा जमावबंदी आदेश लागू होता व मी त्या आदेशाची प्रत प्राप्त केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे तपासात फिर्यादी व साक्षीदार आरोपींच्या घरावर चाल करुन गेले व गुन्हयाचे कृत्य केले असे आढळून आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या वैद्यकिय तपासणीकरीता मी नागोठणे येथील शासकिय रुग्णालयात पत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी व साक्षीदाराच्या दबावाखाली खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे व

आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE Date: 2025.11.15 13:57:02 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)
दि. १७.११.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.